क्र. १५१ पहिले वर्ष

०२ जुलै २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील तेरावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या वाचनामध्ये रोमकरांस पत्र ह्यामध्ये सांगितले आहे की, ख्रिस्ताच्या बरोबरच आपणही जिवंत होऊ असा आपल्याला भरवसा आहे, व आजच्या शुभवर्तमानात सांगितले आहे की, स्वत:चा वधस्तंभ उचलून जो मला अनुसरत नाही तो माझा अनुयायी होण्याच्या योग्यतेचा नाही. एखाद्या कनिष्ठाला तो माझा शिष्य आहे म्हणून कुणी तांब्याभर पाणी पाजलं तरी त्याला त्याबद्दल योग्य ते प्रतिफळ मिळाल्यावाचून राहणार नाही. जनसेवा हीच ईश्वरसेवा होय. सत्कृत्ये करण्यास परमेश्वराची प्रेरणा मिळावी म्हणून प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे स्वर्गीय बापा, ख्रिस्ताच्या प्रकाशात चालण्यासाठी तू तुझ्या मुलांना हाक घालतोस. अंधारापासून आम्हाला मुक्त कर आणि तुझ्या सत्याच्या तेजात आम्हांला सदैव ठेव. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**प्रभूशब्द विधी**

**दोन राजे या पुस्तकातून घेतलेले वाचन** ४:८–११, १४–१६

**''हा देवाचा पवित्र माणूस आहे, त्याला तेथे विश्रांती घेऊ दे.''**

एके दिवशी असे झाले की, अलिशा शूनेम येथे गेला. तेथे एक थोर स्त्री राहत होती; तिने त्यास आग्रह करुन जेवावयास लावले. पुढे तो त्या वाटेने जाई तेव्हा तेथे जेवावयास उतरत असे. ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, ''हा पुरुष वारंवार या वाटेने जातो, हा कोणी देवाचा पवित्र माणूस आहे असे मला दिसते. यास्तव धाब्यावर आपण एक लहानशी खोली करू आणि त्याच्यासाठी एक खाट, एक मेज, एक खुर्ची आणि एक समई अशी तिच्यात ठेवू. म्हणजे तो आपल्याकडे येईल तेव्हा त्या खोलीत उतरत जाईल.''

एके दिवशी असे झाले की तो तेथे येऊन त्या खोलीत उतरला आणि तेथे निजला, त्याने गेहजीला विचारले, ''हिच्यासाठी काय करावे?'' गेहजी म्हणाला, ''तिला काही मूलबाळ नाही, तिचा नवरा वृध्द आहे.'' त्याने म्हटले, ''तिला बोलव.'' त्याने बोलावल्यावर ती येऊन दारातच उभी राहिली. तो तिला म्हणाला, ''वसंतऋतू पुनरुपी येईल तेव्हा तू पुत्रांस उराशी धरशील.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

८८:२–३, १६–१७, १८–१९

प्रतिसाद : **हे प्रभो, तुझ्या दयेविषयी मी नित्य गीत गाईन.**

१. परमेश्वराच्या दयेविषयी मी नित्य गीत गाईन. मी आपल्या मुखाने पिढ्यानुपिढ्या तुझी सत्यता कळवीन. कारण मी म्हणालो, तुझ्या दयेची उभारणी सदोदित होत राहीन; स्वर्गात तुझी सत्यता तूच स्थापली आहेस.

२. ज्या लोकांस उत्साह शब्दाचा परिचय आहे ते धन्य! हे परमेश्वरा, ते तुझ्या मुखप्रकाशात चालतात, ते तुझ्या नावामुळे नेहमी उल्हास करतात, तुझ्या न्यायपरायणतेने त्यांची उन्नती होते.

३. कारण त्यांच्या बलाचे वैभव तू आहेस, तुझ्या प्रसादाने आमचा उत्कर्ष होत राहील. आमची ढाल परमेश्वराच्या मालकीची आहे, आमचा राजाही इस्राएलच्या पवित्र प्रभूचा आहे.

### दुसरे वाचन

**पौलचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन** ६:३–४, ८–११

**''आपण नवीन प्रकारच्या जीवनात चालावे म्हणून आपण स्नानसंस्काराद्वारे ख्रिस्ताबरोबर पुरले गेलो आहोत.''**

आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला. ह्याविषयी तुम्ही अजाण आहा काय? तर आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यातून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे. आपण ख्रिस्ताबरोबर मरण पावलो असल्यास त्याच्याबरोबर जिवंतही राहू असा आपला विश्वास आहे. आपणास ठाऊक आहे की, मेलेल्यांतून उठलेला ख्रिस्त ह्यापुढे मरण पावत नाही; त्याच्यावर यापुढे मरणाची सत्ता चालत नाही. कारण तो मरण पावला, तो पापाला एकदाच मरण पावला, तो जगतो तो देवासाठीच जगतो. तसे तुम्हीही ख्रिस्त येशूमध्ये स्वत:स पापाला मेलेले खरे, पण देवासाठी जिवंत झालेले असे माना.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**प्रे. कृ. १६:२४**

**आलेलुया, आलेलुया!**

हे प्रभो, तुझ्या पुत्राची वचने स्वीकारण्यासाठी आमची अंत:करण प्रफुल्लित कर.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन** १०:३७–४२

**''जो आपला क्रूस उचलून घेत नाही तो मला योग्य नाही.''**

येशूने आपल्या बारा शिष्यांस पुढीलप्रमाणे बोध केला, ''जो माझ्यापेक्षा आपल्या बापावर किंवा आईवर अधिक प्रेम करतो तो मला योग्य नाही, जो माझ्यापेक्षा मुलावर किंवा मुलीवर अधिक प्रेम करतो तो मला योग्य नाही आणि जो आपला क्रूस उचलून घेऊन माझ्यामागे येत नाही तो मला योग्य नाही. ज्याने आपला जीव राखला तो त्याला गमावील आणि ज्याने माझ्याकरिता आपला जीव गमावला तो त्याला राखील.

''जो तुम्हास स्वीकारतो तो मला स्वीकारतो, तो ज्याने मला

पाठवले त्याला स्वीकारतो. संदेष्ट्याला संदेष्टा म्हणून जो स्वीकारतो त्याला संदेष्ट्याचे प्रतिफळ मिळेल आणि नीतिमानाला नीतिमान म्हणून जो स्वीकारतो त्याला नीतिमानाचे प्रतिफळ मिळेल, ह्या लहानातील एकाला शिष्य म्हणून जो कोणी केवळ गार पाण्याचा एक प्याला पाजतो, तो आपल्या प्रतिफळास मुकणारच नाही असे मी तुम्हांला नक्की सांगतो.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद : **हे प्रभो, आम्हांला आरोग्यदान दे.**

१. पोप, कार्डिनल्स, बिशप्स, धर्मगुरू, सिस्टर्स व प्रापंचिक यांच्याद्वारे प्रभू येशू ख्रिस्ताची सुवार्ता पसरविण्यास पवित्र आत्म्याची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. जे लोक आजारी आहेत अशांना परमेश्वराच्या प्रेमाचा स्पर्श व्हावा व त्यांना आरोग्यदान लाभावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. प्रभू ख्रिस्त देवराज्याची सुवार्ता पसरविण्यास परमेश्वर आपली निवड करतो तेव्हा आपण ईश्वरी कार्याचे सहभागीदार व्हावे म्हणून आपण प्रभूची कृपा मागू या.

४. प्रसंगानुसार हेतू सादर करणे.

५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो. त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो परमेश्वरा, दिव्य संस्काराद्वारे तू आम्हांला कृपारुपी सामर्थ्य देतोस. तुझी प्रामाणिकपणे सेवा करण्यास ह्या ख्रिस्तप्रसादाकडून आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, ख्रिस्तबलिदान व ख्रिस्तप्रसाद ह्यांच्यामुळे तुझ्या दैवी जीवनात आम्हांला सहभागी कर व तुझ्या प्रेमाचे दर्शन जगाला घडविण्याकरिता आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

स्वागतशील वृत्ती आणि आदरातिथ्य हे सद्गुण इस्राएली, यहुदी समाजात खूप महत्त्वाचे मानले जात. लोट ह्याने तर आपल्या घरी उतरलेल्या पाहुण्यांचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांच्यावर हल्ला करू पाहणाऱ्या वासनांध पुरुषाला आपल्या उपवर मुली देऊ केल्या. यावरून पाहुण्यांचे स्वागत करणे या समाजात किती महत्त्वाचे मानले जायचे ते दिसून येते. आजची वाचने आपल्याला त्या दृष्टीने तीन गोष्टींवर चिंतन करायला लावतात.

**१) भौतिक स्वरूपाची स्वागतशीलता :** आजच्या पहिल्या वाचनात शुनेम येथील स्त्री अलिशा संदेष्ट्याचे आगतस्वागत करते. त्याला जेवावयास वाढते. इतकेच नव्हे तर तो देवाचा पवित्र माणूस आहे ह्याचे भान ठेवून त्याच्यासाठी एक खोली तयार करते. तिच्यात खाट (विश्रांतीसाठी), मेज व खुर्ची (शास्त्रवाचन वा लेखन करण्यासाठी) आणि एक समई (उजेडासाठी व प्रार्थना करण्यासाठी) इत्यादींची तरतूद करते. परमेश्वराने तिच्या ह्या स्वागतशीलतेचे फळ तिला दिले. तिला बाळाची देणगी मिळाली.

**ब) आध्यात्मिक स्वरूपाची स्वागतशीलता :** प्रभू येशू ख्रिस्तामध्ये परमेश्वर पित्याने अखिल मानवजातीला आध्यात्मिक स्वागतशीलतेचे सुंदर उदाहरण घालून दिलेले आहे. सर्वांना परमेश्वराच्या राज्यात आपल्यासह पंक्तीस बसविण्यासाठी येशू सुखाचा स्वर्ग सोडतो. ह्या पृथ्वीतलावर एक गरीब कुटुंबात राहतो. त्याच्याकडे आलेल्या गरजू व गरजवंतांना भरभरून मदत करतो. मार्था-मरिया, शिमोन कुष्ठरोगी, शिमोन परुशी, जक्कय, मत्तय (किंवा लेवी) अशा सर्वांचे आदरातिथ्य स्वीकारतो. आता संत पौल रोमकरांना आध्यात्मिक स्वागतशीलतेसाठी पाचारण करीत आहे. बाप्तिस्मा स्वीकारणाऱ्या हर एक व्यक्तीने ख्रिस्ताचा स्वीकार केलेला आहे. मात्र हे एक कर्मकांड नसून त्यासाठी पापाचा पूर्णपणे त्याग करून ख्रिस्ताला आपल्या हृदयाच्या घरातील कोपरा न् कोपरा व्यापता यावा अशी आध्यात्मिक स्वागतशीलता त्यांनी धारण करावी असे पौल शिकवितो.

**३) कौटुंबिक व सामाजिक स्वरूपाची स्वागतशीलता :** आपल्या प्रेषितांना प्रेषितीय कामगिरीवर पाठविताना येशू त्यांना लोकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाची पूर्वसूचना देतो. कुटुंबाची आसक्ती असणारे, कामचुकार, आळशी, आत्मकेंद्रित असे लोक येशूच्या विचारसरणीचा स्वीकार करू शकत नाहीत तर येशूचे शिष्य असलेल्या, संदेष्ट्यासमान असलेल्या नीतिमान व्यक्तीचे स्वागत करणाऱ्या लोकांना नक्कीच प्रतिफळ मिळेल अशी शाश्वती तो त्यांना देतो.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात वरीलपैकी कोणत्या स्वरूपाची स्वागतशीलता अधिक प्रमाणात आहे? इतर प्रकारची स्वागतशीलता विकसित करण्यासाठी मला काय काय करता येईल? ●●●

| जुलै २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०३ | सं थॉमस (तां) | : उत्पत्ती १८:१६-३३/मत्तय ८:१८-२२ |
| मंगळ ०४ | पोर्तुगालची सं एलिझाबेथ (हि) | : उत्पत्ती १९:१५-२९/मत्तय ८:२३-२७ |
| बुध ०५ | सं अँथनी मेरी झॅकरी (हि) | : उत्पत्ती २१:५, ८-२०/मत्तय ८:२८-३४ |
| गुरू ०६ | सं मारिया गोरेटी (हि/तां) | : उत्पत्ती २२:१-१९/मत्तय ९:१-८ |
| शुक्र ०७ | पँटिनस (हि) | : उत्पत्ती २३:१-४,१९,२४:१-८, ६२-६७/मत्तय ९:९-१३ |
| शनि ०८ | सं ग्रेगरी ग्रासी आणि साथीदार (हि) | : उत्पत्ती २७:१-५,१५-२९/मत्तय ९:१४-१७ |